शोध पत्र

# ग्रामीण महिलांच्या सबलीकरणात स्वयंसहाय्यता बचत गटांचे योगदान

## ( विशेष संदर्भ यवतामाळ जिल्हा )

* प्रा. डॉ. दीपक द. कोटुरवार

July, 2010

* शिवशक्ति कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बाभुळगाव, यवतमाळ

**प्रस्तावना :**

भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचारानुसार खेड्यातील लोकांना रोजगाराच्या संधी अर्थाजनासाठी शासनाने प्रत्येक खेड्यात उपलब्ध करून द्याव्यात. त्यामुळे खेड्यांचा पर्यायाने भारताचा सर्वांगिण विकास हा आर्थिक संपन्नतेमुळे होवु शकतो. अर्थशास्त्राच्या सिध्दांतानुसार अर्थव्यवस्थेचे दोन भाग पडतात. एक शहरी अर्थव्यवस्था आणि दोन ग्रामीण अर्थव्यवस्था. ह्या दोन्ही अर्थव्यवस्थांचा अभ्यास केला तर आपणांस हे स्पष्ट दिसून येईल की, शहरी अर्थव्यवस्था ही नेहमी श्रीमंत व भांडवलदार वर्गाच्या हाती असल्यामुळे त्या अर्थव्यवस्थेत सर्वसामान्यांना कोठही स्थान नाही आणि असेल तर ते फक्त ऋणको म्हणूनच त्यामुळे जो ऋणको म्हणून काम करतो. त्या घटकांचे कौटुंबिक जीवन अत्यंत हालाखीचे असते. त्या हालाखीच्या कुटुंबामध्ये मोठ्या प्रमाणात ग्रमीण महिला कष्ट सहन करतात. त्यामुळे त्यांना आत्मसन्मानाच्या कोणत्याच भावनेची जाणीव नसल्यासारख्या खेड्यात राहतात. समाजातील अर्धी शक्ती ह्या स्त्रीच्या असतात. ह्याा महिलाच जर आत्मसन्मानाने वागु शकत नसतील तर खेडी ही समृध्द कशी होतील ? हा प्रश्न आपणांसमोर उभा राहतो.

ग्रामीण स्त्रीयांना स्त्री जन्म नको असे म्हणण्यासारखी परिस्थिती आढळते. संसार म्हणजे सुखदु:खाचे मिश्रण अमृताचे व विशाचे प्याले परंतु ग्रामीण स्त्रीयांच्या वाट्याला येते. ते फक्त दु:ख, उपेक्षा आणि कनिष्ठ स्तरावरचे जगणे यामध्येच त्या कोंडलेल्या असतात. मुळातच परक्याचे धन याच दृष्टीकोनातून लहानपणापासून स्त्रीकडे पाहिले जाते म्हणून म्हणतात. मुलगी वाढते । जशी चंद्रम्याची कोर अंतरंगी बापाला पडे घोर । अशी समाजव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न आजही थांबलेला नाही. स्त्री संघटना, मंडळ मंच ह्यांचे कार्य शहरी भागापुरतेच मर्यादित आहे. ग्रामीण भागाकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष झाल्याने ग्रामीण स्त्रीया ह्या अनेक प्रकारच्या दुर्देवाला सामोऱ्या जात आहेत. याच ग्रामीण महिलांच्या दुर्देवी समस्यांचा व त्यांच्या सबलीकरणात महिला बचत गटाचा सहभाग आहे. आणि ग्रामीण महिला ह्या कोणकोणत्या बाबींबाबत मागे आहेत याचा शोध घेण्याचा विचार मनात आला तेव्हा एक राज्यशास्त्राचा अभ्यासक म्हणून आणि शिक्षकीपेशात नौकरी करतांना वेळेचा अपव्यय होणार नाही असाच विशय निवडून अध्ययन करण्याचा संकल्प केला. त्यासाठी ग्रामीण महिलांच्या सबलीकरणात ''स्वयंसहाय्यता बचत गटाचे योगदान'' हा विशय निष्चित केला. त्यासाठी यवतमाळ जिल्हा अध्ययनासाठी घेवून काही तालुक्याची निवड करून बचत गटांचा अभ्यास केला व हा शोध निबंध तयार केलेला आहे.

**1) उद्देश :** ''ग्रामीण महिलांच्या सबलीकरणात स्वयंसहाय्यता बचत गटांचे योगदान'' या शिर्शकावर शोध निबंध लिहीण्याचा मुख्य हेतु किंवा उद्देश खालीलप्रमाणे1) ग्रामीण महिलांच्या विकासात बचत गटाच्या योगदानाचा अभ्यास करणे. 2) ग्रामीण महिलांमध ये राजकीय सामाजिक व आर्थिक जाणीवा आहेत की नाही याचा शोध घेणे. 3) ग्रामीण महिलांच्या दारिद्र्य निर्मूलनात व रोजगार निर्मितीमध्ये महिला बचत गटांच्या भूमिकेचा अभ्यास करणे. 4) ग्रामीण महिलांनी स्थापन केलेल्या बचत गटांच्या स्वरूपाचे अध्ययन करणे.

**2) गृहितके :**—कोणताही शोध निबंध लिहीवयाचा म्हटले तर सुरूवातीला त्या त्या विशयाच्या बाबत संशोधकाला काही गृहितके मनाशी निष्चित करावी लागतात. त्याशिवाय शोध निबंधाचे लिखाण चाकोरीबध्द होवूच शकत नाही. त्यामुळेच त्या शोध निबंध लेखनासाठी पुढील गृहितके निष्चित केली. 1) यवतमाळ जिलह्यातील महिला बचत गटांमुळे यवतमाळ जिल्ह्यातील विविध तालुक्यातील ग्रामीण महिलांच्या विकासात मोठी भर पडली आहे. 2) आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या ग्रामीण महिलांना पुढे आणण्यात महिला बचत गट उपयुक्त ठरले.3) महिला बचत गटामुळे रोजगार निर्मिती झाली. 4) ग्रामीण महिला राजकीयदृष्ट्या जागृत झाल्या.5) महिलांच्या आर्थिकस्तरात बचत गटांमुळे वाढ झाली आहे.

3) **अभ्यासाची पध्दती :—**

**प्रस्तुत शोध निबंधासाठी विश्लेशणात्मक व** सर्वेक्षणात्मक पध्दतीचा अवलंब केला आहे. महिला बचत गटामुळे ग्रामीण महिलांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, मानसिक विकासात काय बदल झाला याचा शोध घेण्यासाठी द्वितीयक सामुग्रीचा आधार घेतला आहे. विविध मासिके, विविध शोध निबंध पुस्तके, कार्यालयीन अहवाल इ. माहितीच्या आधारे मांडणी केली आहे.

**कार्यक्षेत्र :**—महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्ह्यातील काही निवडक बचत गटांचे अध्ययन केले आहे.

**महाराष्ट्रातील बचत गटांची वाटचाल** महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा कार्यक्रमा अंतर्गत 1992 मध्ये प्रायोगिक तत्वावर

आंतरराष्ट्रीय कृशीविकास निधीच्या सहाय्याने चार जिल्ह्यात स्वयंसहाय्यता गटाची निर्मिती करण्यात आली असली तरी सन 1947 साली अमरावती जिल्ह्यात (महाराष्ट्र) सासू सुनांनी एकत्र येवून 25 पैसे बचतीने गट झाल्याचा उल्लेख आहे. तसेच 1970 च्या दरम्यान इलाबेन भट यांनी महिला व सुक्ष्म वित्त पुरवठा या विशयाची मांडणी केली होती. आणि तेव्हापासुनच खऱ्या अर्थाने महिला बचत गटाची निर्मिती झाल्याने सर्वत्र गट स्थापन झाली आहे.. यामध्ये महिला आर्थिक विकास महामंडळाने महत्वाची भूमिका बजावलेली आपणांस दिसते. महाराष्ट्रात सर्वात प्रथम बचत गट चळवळ प्रथम चंद्रपूर जिल्ह्यातील वडसा तालुक्यात सुरू झाली. पुढे याला बळकटी मिळावी म्हणून केंन्द्र व राज्यसरकारांनी विविध जनिर्णय हे जाहिर केले व त्याची अंमलबजावणी केली. त्याची परिणीती म्हणून आज महाराष्ट्रात मार्च 2005 च्या शेवटी गटांची संख्या 71,146 असुन त्या सर्व गटांनी 2,23,411 दशलक्ष अर्थपुरवठा केला आहे.

**यवतमाळ जिल्ह्यातील बचतगटाच्या अध्ययनाचे विश्लेशण** :— सन 2001 च्या जनगणना आकडेवरून आज संपूर्ण जिल्ह्यात 24 लाख 58 हजार 208 इतकी लोकसंख्या आहे. त्यामध्ये पुरूश लोकसंख्या 12 लाख 10 हजार 518 असुन स्त्री लोकसंख्या ही 11 लाख 92 हजार 590 इतकी लोकसंख्या असुन शहरी लोकसंख्या ही फक्त 18.60 टक्के असुन ग्रामीण लोकसंख्या 81. 40 टक्के एवढी आहे. याचाच अर्थ यवतमाळ जिल्ह्यात ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण जास्त असल्यामुळे प्रस्तुत विशय शोधनिबंधासाठी अध्ययनकर्त्यांनी घेतला. मोठ्या प्रमाणात वास्तव्याला असलेल्या ग्रामीण जनतेतील ग्रामीण महिला ह्या आजही आर्थिक, सामाजिक,

तालुका क्र. 1

| तालुका | महिला बचत गटसंख्या | महिला पदाधिकारी संख्या | महिला बचत गटातील सदस्य | एकूण महिला |
|---|---|---|---|---|
| यवतमाळ | 267 | 2403 | 10713 | 13116 |
| बाभुळगाव | 237 | 2844 | 68256 | 71100 |
| कळंब | 245 | 2205 | 69837 | 71042 |
| पांढरकवडा | 595 | 5355 | 59522 | 64877 |
| घाटंजी | 589 | 4123 | 4864 | 8987 |
| राळेगाव | 245 | 2940 | 4246 | 7186 |
| वणी | 481 | 4319 | 83106 | 87435 |
| मारेगाव | 203 | 2436 | 10856 | 13292 |
| दारव्हा | 255 | 2295 | 9728 | 12023 |
| नेर | 169 | 2028 | 39201 | 41229 |
| दिग्रस | 277 | 2493 | 4348 | 6841 |
| पुसद | 270 | 2430 | 79350 | 81780 |
| महागाव | 343 | 3773 | 10108 | 13881 |
| उमरखेड | 390 | 3510 | 9337 | 12847 |
| झरीजामणी | 275 | 2475 | 8344 | 10819 |
| आर्णि | 258 | 3096 | 11383 | 14479 |
| एकूण | 4941 | 48735 | 483199 | 531934 |

राजकीयदृष्ट्या कमकुवत असल्याच्या दिसतात. त्या दृष्टीने त्यांना सबल बनविण्यासाठी जी महिला बचत गट स्थापन झाली आहेत. त्या महिला बचत गटाची मदत म्हणजे गरीब, कमकुवत, मोलमजूरी व दारिद्र्य निर्मूलनासाठी नवसंजीवनी ठरली आहे. सन 2005—06 पर्यंत यवतमाळ जिल्ह्यातील महिला बचत गटाची व त्यामध्ये सहभागी झालेल्या महिलांची दिर्शविणारा तक्ता दिला आहे. **तक्ता क्र. 1:1 देखे स्त्रोत** :— यवतमाळ जिल्हा महिला बचत गट अहवाल 2005—06

वरील तक्ता क्र. 1:1 मध्ये दर्शविल्याप्रमाणे आज जी महिला बचत बटामध्ये महिला सहभागांची एकूण संख्या 531934 दर्शविलेली आहे. त्याचे प्रमाण यवतमाह जिल्ह्यातील महिलांच्या प्रमाणामध्ये 44.60 टक्के असल्याचे दिसून येते. महिला बचत गटातील ग्रामीण महिलांच्या राजकीय, आर्थिक व सामाजिक सहभागाचा अभ्यास करण्यासाठी अभ्यासकाने जिल्ह्यातील फक्त पाच तालुक्यांची निवड करून त्या तालुक्यात असलेल्या फक्त पाच गावांचीच निवड अध्ययनासाठी केली. त्या अभ्यासातून खालील तक्यातील माहिती गोळा करण्यात आली.

**तक्ता क्र. 1:2**

अध्ययनासाठी निवडलेल्या पाच तालुक्यातील ग्रामीण महिला बचत गटांची संख्या दर्शविणारा तक्ता. उपरोक्त तक्त्यावरून

| तालुका | बचत गट असणारी गावांची. संख्या | तालु. क्या. तील बचत गट | निवड. लेली गावांची संख्या | प्रमाण | निवड. लेल्या बचत गटांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| यवतमाळ | 127 | 267 | 5 | 3.93 | 22 | 8.23 |
| बाभुळगाव | 106 | 237 | 5 | 4.71 | 18 | 7.59 |
| कळंब | 121 | 245 | 5 | 4.31 | 14 | 5.79 |
| राळेगाव | 110 | 245 | 5 | 4.54 | 15 | 6.12 |
| नेर | 135 | 169 | 5 | 3.70 | 19 | 11.24 |
| | 599 | 1163 | 25 | 4.17 | 88 | 7.56 |

आपणांस असेच दिसते की, अध्ययन कर्त्यांनी पाच तालुक्यातील एकूण बचत गटापैकी फक्त 7.56 टक्के महिला बचत गटाची निवड अध्ययनासाठी केली. 4.17 टक्के गावांची निवड नमुना म्हणून केली आहे. महिला बचत गटातील ग्रामीण महिलांच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी महिला बचत गटांना आर्थिकदृष्ट्या त्या महिलांना काय मदत केली ? हे जाणून घेण्यासाठी तक्ता क्र. 1:3 मधील माहिती जमा केली व अध्ययन केले. **तकता क्र. 1:3 देखे**

| तालुका | बचत गटांची संख्या | सहभागी महिला | कर्जाच्या लाभार्थी महिला | प्रमाण | कर्ज वाटप |
|---|---|---|---|---|---|
| यवतमाळ | 22 | 654 | 272 | 41.59 | 680000 |
| बाभुळगाव | 18 | 989 | 359 | 36.29 | 1077000 |
| कळंब | 14 | 736 | 435 | 59.10 | 1305000 |
| राळेगाव | 15 | 418 | 183 | 43.77 | 457500 |
| नेर | 19 | 652 | 368 | 56.44 | 1104000 |
| एकूण | 88 | 3449 | 1617 | 46.88 | 4623500 |

अध्ययनासाठी निवडलेल्या गावातील बचत गटांची संख्या व कर्ज लाभार्थी महिलांची संख्या वरील तक्ता क्र. 1:3 मध्ये दर्शविल्याप्रमाणे पाच तालुक्यातील नमुना म्हणून जी 88 बचत महिलांनी कर्जाचा लाभ घेतलेला दिसतो. याचाच अर्थ 46.88 टक्के महिलांनी आपआपला व्यवसाय अर्थार्जनासाठी बचत गटाच्या माध्यमातून सुरू केलेला आहे. ग्रामीण महिलांचे जीवन जगणे हे केवळ चुल आणि मुल एव्हढ्यापुरतेच मर्यादित होते. आज मात्र ह्याच ग्रामीण स्त्रिया महिला बचत गटाच्या सहभागामुळे केवळ आर्थिकदृष्ट्याच जागृत झाल्या आहेत असे नव्हे तर त्यांच्यात राजकीय जागृती झालेली दिसून आली. **तक्ता क्र. 1:4 देखे**

| तालुका | बचत गटातील सहभागी महिलां.ची संख्या | अध्ययन कार्यासा.ठी निवडले.ल्या महिला | प्रमाण | राजकी.य पक्षात काय्र करणा-.या महिला | प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| यवतमाळ | 13116 | 654 | 4.98 | 168 | 25.68 |
| बाभुळगाव | 71100 | 989 | 1.39 | 356 | 35.99 |
| कळंब | 72042 | 736 | 1.02 | 229 | 31.11 |
| राळेगाव | 7186 | 418 | 5.81 | 172 | 41.14 |
| नेर | 41229 | 652 | 1.58 | 298 | 45.70 |
| एकूण | 204673 | 3449 | 1.68 | 1223 | 35.45 |

अध्ययनासाठी निवडलेल्या बचत गटातील महिलांची संख्या व विविध राजकीय पक्षात सहभागी असलेल्या महिलांची संख्या दर्शविणारा तक्ता उपरोक्त तक्त क्र. 1:4 चे निरीक्षण केले असता असता दिसते की, संशोकांनी अध्ययन कार्यासाठी ज्या 334.9 बचत गटातील महिलांची निवड केली त्यापैकी 3447 महिला हाया ग्रामीण महिला राजकीयदृष्टया जागृत झालेल्या आढळल्या. त्यमुळेय आज ग्रामीण महिलांच्या विविध समस्या हया राजकीय व्यासपीठावरून त्या सोडवित असल्याचे दिसून आले.

**निष्कर्ष :–** अध्ययनाअंती निघालेल निष्कर्ष पुढीलप्रमाणे 1.) महिला स्वयंसहायता बचत गटांच्या सहभागमुळे ग्रामीण महिला हया आपला व आपल्या कुटुंबाचा विकास करतांना दिसतात. 2.) महिलांमध्ये बचतीच्या प्रवृत्तीत वाढ झाली.3.) महिलाच्यां कौटुंबिक दर्जात वाढ झाली. 4) ग्रामीण महिला आर्थिक व मानसिकदृष्टया सबल झाल्या. 5) समाजात महिलांचे विविध दबावगट तैयार झाले. 6) कुटुंब प्रमुखाची सावकारी पाशातून मुक्तता केली. 7 महिलांमध्ये स्वः अस्तित्वाची जाणीव झाली. 8) महिला नेतृत्व करण्यासाठी पुढे आल्यात. 9) सामाजिक जबाबदारीची जाणीव स्त्रीयांना झाली. 10) महिला उद्योगी बनल्यात. 11) महिलांचा राजकीय सहभाग वाढला. 12) महिलांच्या व्यावहारिक ज्ञानात भर पडली. 13) स्त्री दृष्टीकोनाबाबत पुरूशांची मानसिकता बदलविली. 14) महिला संघटीत झाल्या. 15) महिलांच्या राजकीय शक्तीत वाढ झाली. स्वयंसहाय्यता बचत गट खऱ्या अर्थाने ग्रामीण महिलांना सामाजिक, आर्थिक, राजकीयदृष्ट्या सक्षम करण्यात यशस्वी झालेले दिसतात.

## संदर्भ ग्रंथ

1) मुलाणी प्रा. एम. यु. ''महिला स्वयंसहाय्यता बचत गट'' पृश्ट क्र. 50,54 2) देषपांडे मेघा ''भारतातील स्वयंसहाय्यता गट पार्श्वभूमी व वाटचाल, पूणे प्रकाषन'' 3) कुळकर्णी प्रा. विजय ''बचतनामा'' 4) अर्थसंवाद, जुलै, सप्टेंबर 2007 पृ. 9 5) पाटील डॉ. लिला ''भारतातील स्त्रीजीवन'' 6) बचतगट मार्गदर्षिका पूणे 7) लोकसत्ता पुरवणी कॉन्सेलर 25 ऑकटो उपरोक्त तक्ता क्र. 1:4 चे निरीक्षण केले असता असे दिसते की, संषोधकांनी अध्ययन कार्यासाठी ज्या 3449 बचत गटातील महिलांची निवड केली त्यापैकी 1223 महिला ह्या आज बचत गटाच्या सहभागामुळे विविध राजकीय पक्षात कार्यकर्त्या म्हणून काम करीत असल्याचे दिसले. याचाच अर्थ ह्या ग्रामीण महिला राजकीयदृष्ट्या जागृत झालेल्या आढळल्या. त्यामुळेच आज ग्रामीण महिलांच्या विविध समस्या ह्या राजकीय व्यासपीठावरून त्या सोडवित असल्याचे दिसून आले. निष्कर्ष :– अध्ययनाअंती निघालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे 1) महिला स्वयंसहाय्यता बचत गटांच्या सहभागामुळे ग्रामीण महिला ह्या आपला व आपल्या कुटुंबाचा विकास करतांना दिसतात. 2) महिलांमध्ये बचतीच्या प्रवृत्तीत वाढ झाली. 3) महिलांच्या कौटुंबिक दर्जात वाढ झाली. 4)ग्रामीण महिला आर्थिक व मानसिकदृष्ट्या सबल झाल्या. 5) समाजात महिलांचे विविध दबावगट तयार झाले. 6) कुटुंब प्रमुखाची सावकारी पाषातून मुक्तता केली. 7) महिलांमध्ये स्वःअस्तित्वाची जाणीव 2007 8) K- Manjula Devi, 1997 Rular Woman Poverty Alleviation Programme “First edition” Anmol Publication New Delhi 9) गोखले सौ. स्मृती व लांब पल्ला ''महिला सक्षमीकरण''10) यवतमाळ जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अहवाल 2005–06 11) चव्हाण षाम ''स्वयंसहाय्यता गट सहभागी देखरेख पध्दती''